दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.३१ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १५६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 31 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 156 • Pages 4 • Rate 4 Rs

दैनिक वादळ वार्ता
RNI/MAHMAR/2023/87555
॥ महाराष्ट्रभर प्रतिनिधी नेमणूक ॥
https://epaper.vadalvarta.com
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके, सर्कल व गावे येथे उत्साही, निर्भिड व समाजभान असलेले प्रतिनिधी नेमायचे आहेत.
पदे: जिल्हा प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, सर्कल प्रतिनिधी, गाव प्रतिनिधी
पात्रता: पत्रकारितेची आवड व सामाजिक भान; स्थानिक प्रश्न मांडण्याची क्षमता; मोबाईल / डिजिटल माध्यमांचे ज्ञान; बातमी लेखन व फोटो / व्हिडिओ पाठवण्याची तयारी; अनुभव नसला तरी चालेल (नवीन उमेदवारांना संधी)
प्रतिनिधींना मिळणाऱ्या सुविधा: दैनिक वादळ वार्ता ओळखपत्र; सामाजिक प्रश्नांना व्यासपीठ; बातम्या प्रसिद्ध करण्याची संधी; पत्रकारितेत नाव व ओळख; पुढील काळात विशेष संधी व जबाबदाऱ्या
विशेष सूचना: निर्भिड, अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्यांना प्राधान्य; ग्रामीण व शहरी भागातील उमेदवारांचे स्वागत
मुख्य संपादक : अजय भांगे | संपर्क मो.न.9422660077

# सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होणार

## पद स्वीकारण्यास होकार,आज शपथविधी होण्याची शक्यता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदावर कोण बसणार, अशी चर्चा सुरू झाली असून यात सुनेत्रा पवारांच्या नावावरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास होकार दिला असल्याचे समजते. तसेच आज सायंकाळी ५ वाजता शपथविधी देखील पार पडणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानुसार सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार हे मुंबईकडे रवाना झाले आहेत.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाची शनिवारी दुपारी २ वाजता महत्त्वाची बैठक होणार असून या बैठकीत उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे बोलले जात आहे. इतकेच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा देखील सुनेत्रा पवारच असाव्यात यावर पक्षातील नेत्यांचे एकमत झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच पार्थ पवारांना राज्यसभेवर पाठवण्याची चर्चा सुरू असल्याचेही समजते.बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना केले होते. त्यामुळे सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, तर त्या महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री ठरतील. तसेच नरेश आरोरा हे सुनेत्रा पवारांचा निरोप घेऊन मुंबईकडे रवाना झाल्याचे देखील समोर आले आहे. राजकीय गोष्टींची चर्चा करण्यासाठी सुनेत्रा पवारांनी नरेश आरोरा यांना बारामती येथे बोलावले असल्याची माहिती आहे. त्यानुसार नरेश आरोरा आणि सुनेत्रा पवार यांच्यात चर्चा झाल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आरोरा मुंबईकडे रवाना झाले असल्याची माहिती समोर आली आहे.



# आम्ही आमचा नेता गमावला:आमचे आयुष्य आता आधीसारखे नसणार-अदिती तटकरे

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, आपल्या या कणखर नेत्याला गमावल्याची भावना पक्षातील प्रत्येक नेत्याच्या मनात दाटून आली आहे. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आपल्या भावना व्यक्त करताना अक्षरशः ढसा-ढसा रडल्याचे पाहायला मिळाले.एका वृत्तवाहिनीला बोलताना अदिती तटकरे भावुक झाल्याचे पाहायला मिळाल्या. त्या म्हणाल्या, आम्ही आमचा नेता गमावला. त्यांना परत बघता येणार नाही. हे कधीही न भरून निघणारे दुःख आहे. त्यांनी नेहमीच आम्हा सगळ्यांना पाठबळ दिले, आधार दिला. चांगले काम केले तर प्रशंसा करायचे. थोड्या कुठे चुका झाल्या तर हक्काने वडिलांसारखे ओरडायचे, मार्गदर्शन करायचे. एक दिवस असा गेला नाही की, दादांचे नाव तोंडातून निघाले नसेल. आम्ही यापुढे काम करत असताना प्रत्येक बाबतीत त्यांची आठवण येत राहील, असे म्हणताना तटकरेंना रडू कोसळले. पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, सगळ्या बाजूने दादांनी केलेल्या कामांचे कौतुक होत आहे. महाराष्ट्राने काय गमावले याबाबत सर्व बोलत आहेत आणि ते ऐकायला आज दादा नाहीत. त्यांनी नेहमीच भरभरुन प्रेम दिले. वडिलांचे जसे मार्गदर्शन मिळत आले, तसे त्यांचेही नेहमी मिळत आले. ते प्रोत्साहन देत राहिले. नेहमी तरुणांना, महिलांना, युवतींना संधी मिळाली पाहिजे, नवे नेतृत्व घडले पाहिजे हेच त्यांचे नेहमी असायचे.तुम्ही एखाद्या कार्यकर्त्याला कसे घडवायचे, त्याला ताकद कशी द्यायची, त्याला प्रशासकीय ज्ञान कसे द्यायचे, मला आठवते की, मी २०१९ मध्ये आमदार झाले त्यावेळी पहिले भाषण कसे करायचे हे मी दादांकडून शिकले. अगदी बजेटचे मुद्दे कसे मांडायचे, पुरवणी मागण्या, भाग क्रमांक, पान क्रमांक बोलून कसे उठायचे, या सगळ्या गोष्टी त्यांनी शिकवल्या. सभागृह हे आधीसारखे नसणार आहे. आमच्या सगळ्यांचे आयुष्य सुद्धा त्यांच्याविना आधीसारखे नसरणार आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया अदिती तटकरे यांनी दिली आहे.यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी देखील प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, दादांच्या अकाली जाण्याने आम्ही सर्वजण मानसिकदृष्ट्या खचलेलो आहोत. त्यामुळे काही बोलण्याच्या मनःस्थितीत आमच्यापैकी कोणी नाही, अशी भावना सुनील तटकरे यांनी व्यक्त केली आहे.

# 'शिंदेंना आत घेऊन या' म्हणणारे दादाच उरले नाहीत

## ज्यांच्यासोबत उठलो-बसलो, त्यांनाच शेवटचे पाहता आले नाही-आनंद शिंदे

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अंत्यदर्शनासाठी राजकीय क्षेत्रासोबतच कला क्षेत्रातील दिग्गजांनीही मोठी गर्दी केली होती. प्रसिद्ध गायक आनंद शिंदे हेदेखील आपल्या लाडक्या नेत्याला शेवटचा निरोप देण्यासाठी पोहोचले होते, मात्र गर्दीमुळे त्यांना आत प्रवेश मिळू शकला नाही. यावेळी आपली खंत व्यक्त करताना ते अत्यंत भावुक झाले. ज्या दादांसोबत मी अनेक वर्षे उठलो-बसलो, आज त्यांच्याच दर्शनासाठी आत जाता आले नाही. आता फोन करताच 'शिंदेंना आत घेऊन या' असे हक्काने सांगणारा माणूसच राहिला नाही, अशा शब्दांत त्यांनी आपले दुःख मांडले. एका जवळच्या मित्राला आणि खंबीर पाठीराख्याला गमावल्याची भावना व्यक्त करत त्यांनी हात जोडून तिथून निघणे पसंत केले. यावेळी बोलताना आनंद शिंदे म्हणाले, आता काहीच सुचत नाही. आत इतकी गर्दी आहे की मी सुद्धा आतमध्ये जाऊ शकलो नाही. ही खेदाची गोष्ट आहे की मी इथपर्यंत येऊन त्यांचे दर्शन घेऊ शकलो नाही. ज्या दादांसोबत मी बसलो उठलो, कोणाचे काही काम असले की मी थेट दादांना फोन करायचो. मग दादा सांगायचे शिंदेंना घेऊन या. पण आता दादाच तिथे आहेत मग मला कोण फोन करून बोलावून घेणार. दादांना शेवटचे भेटता येत नसल्याने आनंद शिंदे भावुक झाले होते. तसेच त्यांनी तिथून निघून जाणे पसंत केले.दरम्यान, अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, अत्यंत जड अंतःकरणाने त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. लाखांचा जनसमुदाय, समर्थक आणि सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत अजित दादा पंचतत्वात विलीन झाले.धडाडीचे नेतृत्व आणि विकासकामांचा झपाटा लावणारा एक कणखर नेता हरपल्याची भावना जनसामान्यांमध्ये आहे. आता पुन्हा कधीही सभेच्या व्यासपीठावर किंवा पत्रकार परिषदेत दादांचा तो रोखठोक आणि मिश्किल आवाज ऐकू येणार नाही, या विचाराने त्यांचे कार्यकर्ते आणि चाहते भावुक झाले आहेत. आपल्या हक्काच्या माणसाला अखेरचा निरोप देताना उपस्थित असलेल्या प्रत्येकाला भावना अनावर झाल्या होत्या.

# वादळी कट्टा

विमान आभाळात कोसळतं, कारण म्हणे बिघाड झाला,
हेलिकॉप्टर ढगात हरवतं, योगायोग सांगून मोकळा झाला.
चारचाकी रस्त्यावर पलटते, चालक ठरतो कसूरदार,
वाहन बदलतं, कथा बदलते, प्रश्न मात्र तोच हजार.

आकाशाचे नियम वेगळे, रस्त्याची वाट निराळी,
पण सत्य दडपण्याची भाषा सत्तेला नेहमीच प्यारी.
विमान, हेलिकॉप्टर, चारचाकी - बदलतो फक्त आकार,
अपघाताची कारणं तीच, संशय मात्र हजार.

हेलिकॉप्टरमध्ये बिघाड, विमानात मानवी चूक,
चारचाकीत ब्रेक फेल म्हणत मिटवतात एक धूळफूक.
यंत्रावर दोष टाकून माणसं हात झटकतात,
मनात मात्र लोक हळूच घात शब्द कुजबुजतात.

फुलांच्या हारात गुंडाळून प्रश्न केले जातात शांत,
तपास समिती कागदापुरती, सत्य होतं अदृश्य अंत.
आभाळ, रस्ता, धावपट्टी - सगळीकडे संशयाची साथ,
म्हणूनच जनतेच्या ओठांवर प्रश्न - अपघात की घात?

संपादक
अजय भांगे



"झाडे लावा
झाडे जगवा

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील!; अजित पवार असतानाच प्रयत्न सुरू होते:आता शरद पवार निर्णय घेतील-नरहरी झिरवाळ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**



दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांना वेग आला असून, अजित पवार असतानाच यासाठी प्रयत्न सुरू झाले होते, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. त्यातूनच नगर परिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका एकत्र लढवण्याच्या निर्णयानुसार जागावाटप झाले होते, त्यामुळे पवार साहेब आमचा नक्की विचार करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील, कारण अजित पवार असतानाच त्यांनी यासाठी प्रयत्न सुरू केले होते. न.प. आणि जि.प, पंचायत समिती यामध्ये एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्णय झाला त्या अनुषंगानेच जागावाटप झाले. त्यामुळे पवार साहेब आमचा विचार करतील. त्या दृष्टीने आम्ही साहेबांकडे जाण्यापेक्षा साहेब आम्हाला बोलू शकतात किंवा सांगू शकतात, कारण आम्ही आता पोरके झालो आहोत.नरहरी झिरवाळ म्हणाले की, शरद पवार यांची प्रकृती गंभीर झाली किंवा दोन पक्ष वेगळे झाले तरी शरद पवार हे आतून मार्गदर्शन आणि सहकार्य करत होते. अजित पवार यांना शरद पवारांच्या नावाने एक आधार होता. शरद पवार पक्षाच्या भवितव्यासाठी निर्णय घेतील.मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की, सर्व नागरिकांची अशी मागणी आहे की वहिनींना मंत्रिमंडळात समाविष्ट केले पाहिजे. पवार कुटुंब एकत्र आले आहेच. पवार कुटुंबाने एकत्र राहणे गरजेचे आहे हे सर्व सामान्य नागरिकांची मागणी आहे. अनेक नेत्यांना अजित पवार गेल्याने खूप त्रास होत आहे. अजित पवारांच्या आठवणी कायम सोबत राहतील. अजित पवार यांच्यासारखा नेता होऊच शकत नाही.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरहरी झिरवाळ म्हणाले की, अजित पवार यांच्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे.अजित पवार यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे हे राष्ट्रवादी काँग्रेससमोरील मोठे आव्हान आहे. झिरवाळ यांच्या विधानामुळे हे आव्हान अधिक ठळकपणे समोर आले आहे. येत्या काही दिवसांत पक्षांतर्गत बैठकांमध्ये आणि सत्ताधारी आघाडीत यावर सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे.

# अजित पवारांच्या आठवणीने आ.क्षीरसागर यांना अश्रू अनावर

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे विमान अपघातात अकाली निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. बारामतीमध्ये सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळाला. बारामती येथे अजित पवारांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर अनेक ठिकाणी शोक सभांचे आयोजन करण्यात आले. बीड येथे झालेल्या शोकसभेत शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. साहेब आणि दादा आम्हाला वेगळे कधीच नव्हते, अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. तसेच आपण पवार कुटुंबीयांच्या निर्णयासोबत राहणार असल्याचे क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

बीड येथे अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत संदीप क्षीरसागर यांना भावना अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. पवार कुटुंब एकत्र बसून जो निर्णय घेतील त्या निर्णयासोबत आम्ही राहणार असल्याचे क्षीरसागर म्हणाले. साहेब आणि दादा आम्हाला वेगळे कधीच नव्हते, असे म्हणताना क्षीरसागर यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले.संदीप क्षीरसागर म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी वेगळे झाले तेव्हा आम्ही साहेबांना म्हणत होतो की अजित दादांच्या हातात तुम्ही सूत्र द्या, आता देखील पवार कुटुंब एकत्र बसून जो निर्णय घेतील आम्ही त्या निर्णयासोबत आहोत. पवार कुटुंबाशिवाय आम्हाला काहीच दिसत नाही, असे क्षीरसागर म्हणाले.

अजित पवार यांच्या निधनानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांना राजकीय वर्तुळात वेग आला असून, पक्ष एकत्रीकरणाचा महत्त्वपूर्ण निर्णय पवार कुटुंबीय लवकरच एकत्र बसून घेण्याची चिन्हे आहेत. यापूर्वी झालेल्या प्राथमिक चर्चांमध्ये सुप्रिया सुळे, जयंत पाटील, अमोल कोल्हे आणि शशिकांत शिंदे यांसारख्या प्रमुख नेत्यांचा सहभाग होता. मात्र आता बदललेल्या परिस्थितीत संपूर्ण पवार कुटुंब या विषयावर सविस्तर विचारमंथन करणार असून, विलीनीकरणाबाबतचा अंतिम शब्द ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाच असेल, अशी माहिती समोर येत आहे.

# संपादकीय

## शब्दाला जागणारा नेता

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे नाव साडेतीन दशके सातत्याने चर्चेत राहिले. लोकसभेची अल्पकालीन कारकीर्द वगळता ते सातत्याने बारामती मतदारसंघातून निवडून आले. विकासाची दूरदृष्टी, परखड, स्पष्टवक्ता, प्रशासनावर पकड आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या अजितदादांचे विमान अपघातात निधन झाले. बारामतीचा विकास पाहता आमदार कसा असावा, याचे ते ज्वलंत उदाहरण होते.शरद पवार यांचे पुतणे म्हणून राजकारणात प्रवेश करणारे अजित पवार केवळ त्यांच्या वारशावर उभे राहिले नाहीत, तर स्वतःची वेगळी ओळख, शैली आणि ताकद निर्माण करून गेले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक निर्णयक्षमता आणि प्रशासकीय अनुभव यामुळे ते समर्थकांसाठी 'कामाचा नेता' होते. अजित पवार म्हणजे एक कडक प्रशासक, वित्तीय शिस्तीचा आग्रह धरणारा आणि निर्णय घेताना फारसा भावनिक न होणारा नेता अशी त्यांची ओळख. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा राज्याचा अर्थसंकल्प हाताळला. सिंचन, पाणीवाटप, कृषी अर्थकारण आणि पायाभूत सुविधा हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राहिले. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा मोठा प्रभाव राहिला. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून नंतरच्या राजकीय घडामोडींपर्यंत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणे आणि नंतर पक्षातच फूट पाडत वेगळ्या गटासह सत्तेत सहभागी होणे, या घटनांनी त्यांच्या राजकारणातील व्यवहार्य आणि सत्ताकेंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला. समर्थकांच्या मते अजित पवार हे वास्तववादी राजकारणी होते. 'सत्तेत राहिल्याशिवाय काम करता येत नाही' हा त्यांचा अप्रत्यक्ष संदेश अनेकांना व्यवहार्य वाटल्यामुळेच अनेक आमदार, नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले.अजित पवार यांचे नेतृत्व हे करिष्म्यापेक्षा नियंत्रणावर आधारित होते. ते भावनिक भाषणांपेक्षा आकडेवारी, योजना आणि निधी यांवर अधिक भर देत. अधिकारी वर्गावर पकड ठेवणे, निर्णयांची अंमलबजावणी करून घेणे आणि विरोधाला थेट सामोरे जाणे ही त्यांची शैली होती. अजित दादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दुर्लक्ष करता न येणारे व्यक्तिमत्त्व. घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि निर्माण केलेले वाद यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. स्पष्टवक्तेपणा, कठोर प्रशासकीय भूमिका आणि आक्रमक राजकारण यासाठी ओळखले जाणारे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा जबाबदारी सांभाळली. वित्त खाते, नियोजन विभाग यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी हाताळली. अर्थसंकल्पीय बाबींवरील प्रभुत्व आणि आकडेवारीवरील पकड यामुळे ते एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जात. त्यांची कार्यशैली अत्यंत शिस्तप्रिय आणि कधी कधी कठोर मानली जाते. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा त्यांना सहन व्हायचा नाही. अधिकाऱ्यांना थेट सूचना देणे, वेळेवर निर्णय घेणे आणि कामाचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्र हे अजित पवार यांच्या राजकारणातील महत्त्वाचे विषय राहिले. दुष्काळी भागासाठी पाणी उपलब्ध करून देणे, कालवे, धरणे आणि सिंचन प्रकल्प राबवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. काही प्रकल्पांवरून त्यांच्यावर टीकाही झाली, चौकशी झाली; मात्र त्यांनी नेहमीच आपण घेतलेले निर्णय विकासासाठीच होते, अशी भूमिका मांडली. अजित पवार यांच्या वाट्याला राजकारणातील चढउतार आले. पक्षांतर्गत मतभेद, सत्तास्थापनेदरम्यान घेतलेले धक्कादायक निर्णय तसेच राजकीय भूमिका बदल यामुळे ते कायम चर्चेत राहिले. लोकसभा, विधानसभेत किंवा सार्वजनिक सभांमध्ये मुद्देसूद आणि थेट भाषेत बोलत. अलंकारिक भाषेपेक्षा वास्तववादी आणि कधीकधी बोचऱ्या शब्दांचा वापर ही त्यांची खरी ओळख. ग्रामीण भागातील जनतेला ही शैली आपलीशी वाटते. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अजित पवार यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने व्यवहार्य राहिला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शरद पवार यांच्या राजकीय शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा प्रभाव होता; मात्र अजित पवार यांनी स्वतःची स्वतंत्र, आक्रमक आणि कधी कधी बंडखोर अशी प्रतिमा निर्माण केली.सत्तेत असो वा विरोधात; अजितदादांची भूमिका नेहमीच प्रभावी राहिली. अजित पवार हे कार्यक्षम, परंपरागत राजकारणापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारणारे नेते होते. स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, कठोर प्रशासकीय भूमिका आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे अजित पवार यांची ओळख एक कठोर प्रशासक नेता अशी निर्माण झाली. ते केवळ राजकारणी नसून एक कार्यक्षम प्रशासक म्हणूनही ओळखले गेले. अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे पुतणे होते; मात्र त्यांनी केवळ घराणेशाहीच्या जोरावर राजकारणात स्थान मिळवले, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी अनेक वेळा समर्थपणे सांभाळल्या. अधिकारी वर्गाला थेट प्रश्न विचारणे, वेळेची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि निकालाभिमुख प्रशासन यावर त्यांचा भर असायचा. अनेक वेळा त्यांच्या भाषेतील रोखठोकपणा चर्चेचा विषय ठरायचा; मात्र काम लवकर आणि प्रभावीपणे पूर्ण व्हावे, हाच त्यामागील उद्देश असायचा.जलसंपदा मंत्री असताना त्यांनी अनेक सिंचन प्रकल्पांना गती दिली. अवघड परिस्थितीतही निर्णय घेण्याची त्यांची तयारी असायची. राजकीय धाडस, सत्ता संतुलनाचे भान आणि प्रसंगी आक्रमक भूमिका घेण्याची क्षमता यामुळे ते वेगळे ठरले. महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांनी राज्याच्या आर्थिक नियोजनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्प मांडताना वास्तववादी आकडे, विकासावर भर आणि वित्तीय शिस्त यांचा समतोल साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून आला.कठोर प्रशासक असूनही अजितदादांनी जनतेशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. दौरे, आढावा बैठक, प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी यामुळे ते जमिनीवरील वास्तव जाणून घेत. बारामती मतदारसंघातील विकासकामे हे दादांच्या कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण मानले गेले. ते लोकप्रियतेपेक्षा कार्यक्षमतेला प्राधान्य देत. त्यांच्या मते, प्रशासन हे शिस्त, वेग आणि निर्णयांवर चालते. त्यामुळेच त्यांना 'कठोर पण कार्यक्षम प्रशासक' अशी ओळख मिळाली. त्यांच्या कार्यशैलीवर टीका होत असली, तरी राज्याच्या प्रशासनात गती, शिस्त आणि विकासाचा दृष्टिकोन रुजवण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आता मात्र ही सर्व चर्चा थांबणार आहे. राज्यातील जनता नेहमीच त्यांना आठवणींमध्ये जपणार आहे.

# नाशिकच्या विकासाशी नाळ जुळलेला नेता

नाशिक जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस नंबर १ राहण्यामागे देखील अजित दादा पवार यांचे मोठे योगदान राहिले आहे. भगूर नगर परिषदेवर २५ ते ३० वर्षांनी राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांची सत्ता आली. भगूर येथील अजित दादांच्या सभेने नगर परिषद निवडणुकीचे वातावरण राष्ट्रवादीच्या बाजूने झुकले. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेती, धरणे तसेच विविध विकासकामे मार्गी लावण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सिंहाचा वाटा होता. विशेषतः सिन्नर तालुक्यातील गारगाई-देव नदी जोड प्रकल्पाला त्यांनी प्रशासकीय मान्यता मिळवून दिली. त्यामुळे हा राज्यातील एका तालुक्यासाठी असलेला एकमेव प्रकल्प ठरला आहे. नांदूर मधमेश्वर धरणाला गेट बसवण्यासाठी दिलेले योगदान, जिल्ह्यातील एकमेव सहकारी तत्त्वावर सुरू असलेल्या कादवा साखर कारखान्याला मिळालेले पाठबळ, तसेच दिंडोरीतील वळण योजना ही आज शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाने नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र एका प्रगल्भ नेतृत्वाला मुकला आहे. सन १९८४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातील १४ पैकी १३ जागांवर पुलोदचे आमदार निवडून देत नाशिककरांनी शरद पवार यांना भक्कम साथ दिली होती. त्यानंतर १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतरही ग्रामीण जनतेने पक्षाला भरभरून पाठिंबा दिला. २०२२ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतरही नाशिककरांनी अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत ग्रामीण भागातील ११ पैकी सात आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून दिले. ग्रामीण भागाची तळमळ असलेले नेते म्हणून अजित पवार यांची ओळख होती. नाशिकचे लोकप्रतिनिधी कोणतीही समस्या किंवा प्रश्न घेऊन गेले असता, काही अपवाद वगळता ते प्रश्न मार्गी लागल्याशिवाय राहत नसत. सिन्नर तालुक्यातील गारगाई-देव नदी जोड प्रकल्पासाठी खासदार हेमंत गोडसे यांनी प्रयत्न केले, तर प्रशासकीय मान्यतेसाठी आमदार माणिक कोकाटे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अजित पवार यांच्या निर्णायक भूमिकेमुळे हा प्रकल्प मंजूर झाला असून, दुष्काळ हटविण्यासाठी तो मोलाचा ठरणार आहे. नांदूर मधमेश्वर धरण परिसरात गाळ साचल्यामुळे पाणी शेतीपर्यंत पोहोचत नव्हते, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. या धरणाला गेट बसवण्यासाठी आमदार दिलीप बनकर यांनी पाठपुरावा केला. अजित पवार यांनी त्यांना भक्कम साथ दिल्याने हा प्रकल्प पूर्ण झाला आणि परिसरातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. निफाडसह इतर अनेक साखर कारखाने चुकीच्या धोरणांमुळे अडचणीत आले. मात्र जिल्ह्यातील एकमेव सहकारी तत्त्वावर चालणारा कादवा सहकारी साखर कारखाना अजित पवार यांच्या मदतीमुळे आजही चांगल्या स्थितीत आहे. या कारखान्याचे दीर्घकाळ चेअरमन असलेले श्रीराम शेटे यांना शरद पवार यांच्यासह अजित



पवार यांचे मोठे पाठबळ लाभले. पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळवण्यासाठी दिंडोरी तालुक्यातील वळण योजना हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प तत्कालीन उपाध्यक्ष तथा मंत्री नरहरी झिरवळ यांच्या माध्यमातून अजित पवार यांनी यशस्वीपणे मार्गी लावला. त्यामुळे नद्यांमध्ये पाणी वाहू लागले आणि सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला. नाशिकच्या शेतकऱ्यांची अर्थवाहिनी असलेली जिल्हा बँक डबघाईस आली. त्यामुळे अल्प, मध्यम व अल्पभूधारक शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आले. या बँकेला ऊर्जितावस्था आणण्यासाठी राज्य शासनाने हरप्रकारे प्रयत्न केले. परंतु कर्ज वसुली प्रमाणात न झाल्यामुळे बँकेला ऊर्जितावस्था येत नव्हती. बँकेची स्थिती सुधारावी यासाठी अजित दादांनी विशेष पॅकेज देखील जाहीर केले. पवार यांच्या प्रयत्नाने सहकार तज्ज्ञ विद्याधर अनासकर यांना जिल्हा बँकेच्या सल्लागार पदी नियुक्ती केली. परिणामी बँकेची वसुली देखील आता काही प्रमाणात पुढे सरकली असून भाग भांडवल निधीच्या आधारे बँक पुन्हा जिवंत होईल अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून उपस्थित केली जात आहे. जिल्हा बँकेच्या मदतीमुळे त्यांची कृषी आणि सहकार क्षेत्राविषयी आस्था दिसून येते. नाशिक जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस नंबर १ राहण्यामागे देखील अजित दादा पवार यांचे मोठे योगदान राहिले आहेत. भगूर नगर परिषदेवर २५ ते ३० वर्षांनी राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षाची सत्ता आली. भगूर येथील अजित दादांच्या सभेने नगर परिषद निवडणुकीचे वातावरण राष्ट्रवादीच्या बाजूने झुकले. परिणामी नगराध्यक्ष म्हणून प्रेरणा बलकवडे या नगराध्यक्षा झाल्या. अजितदादा पवार यांच्यावर नाशिकच्या ग्रामीण जनतेचा प्रचंड विश्वास होता. त्यांचेही नाशिकवर विशेष असे लक्ष होते. कृषी आणि सहकार खात्यांवर त्यांचे विशेष प्रेम होते. नाशिकमधील सात आमदारांसाठी ते ऊर्जा स्रोत होते. मात्र त्यांच्या अचानक जाण्याने नाशिक जिल्ह्यातील विशेषतः ग्रामीण भाग आज पोरका झाला आहे.

# अजित पवारांचा पाच दिवसांपूर्वी मराठवाड्याचा शेवटचा दौरा

२५ जानेवारी रोजीच सायंकाळी साडेपाच वाजता ते नांदेडच्या विमानतळावरून मुंबईला रवाना झाले. पाच दिवसांपूर्वीच नांदेडला आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीजवळ एका विमान दुर्घटनेत अशा प्रकारे मृत्यूला सामोरे जातील, असे कोणाला स्वप्नातही वाटले नाही.महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे पाच दिवसांपूर्वीच मराठवाडा दौऱ्यावर आले होते. हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदी समागम कार्यक्रमासाठी २५ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता अजित पवार नांदेडच्या विमानतळावर दाखल झाले होते. मुख्यमंत्र्यांना येण्यासाठी वेळ असल्याने विमानतळावरील स्वागत स्वीकारून उपमुख्यमंत्री अजित पवार हे नांदेडच्या शासकीय विश्रामगृहाकडे रवाना झाले. तेथून दुपारी अडीच वाजता त्यांनी नांदेड येथील पवित्र सचखंड गुरुद्वारा येथे जाऊन दर्शन घेतले. त्या ठिकाणी त्यांचा मोठा सत्कार करण्यात आला. कार्यकर्ते व भाविकांशी चर्चा करून ते नांदेड येथील मोदी मैदान येथील कार्यक्रमाकडे रवाना झाले. त्या ठिकाणी त्यांनी १६ मिनिटे मराठी व हिंदीतून भाषण केले. श्री गुरुतेग बहादूर यांच्या बलिदानाचा वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख करून त्यांनी अभ्यासपूर्ण भाषण केले. विशेष म्हणजे निवेदकांच्यावतीने त्यांना भाषणाअगोदरच मराठी आणि हिंदीतून या दोन्ही भाषेतून मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तो शब्द पाळत १६ मिनिटांचे भाषण केले. मराठवाड्यासाठी त्यांचा हा दौरा शेवटचा दौरा ठरला. २५ जानेवारी रोजीच सायंकाळी साडेपाच वाजता ते नांदेडच्या विमानतळावरून मुंबईला रवाना झाले. पाच दिवसांपूर्वीच नांदेडला आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीजवळ एका विमान दुर्घटनेत अशा प्रकारे मृत्यूला सामोरे जातील, असे कोणाला स्वप्नातही वाटले नाही. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच संपूर्ण मराठवाडा हळहळला. विशेष म्हणजे मागील चार महिन्यांत त्यांचे मराठवाड्यात पाच दौरे झाले होते. मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील तेर हे गाव



अजित पवार यांची सासरवाडी. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच धाराशिव जिल्ह्यात बंद पाळून अजितदादांना आदरांजली वाहण्यात आली.नगरपालिका व पंचायत समिती निवडणूक प्रचारानिमित्त दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्यात चांगलीच पकड निर्माण केली. या निवडणुकीपूर्वी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मराठवाड्यातील अनेक दिग्गज नेत्यांनी प्रवेश केला. अजित पवार यांची कार्यशैली अलीकडच्या काळात मराठवाड्यात चांगलीच गाजली. राज्याच्या तिजोरीची चावी आपल्याकडे आहे. विकासासाठी मी कधीही तयार आहे, असे सांगून त्यांनी मराठवाड्यातील अनेक नेते तसेच पदाधिकाऱ्यांना दिलासा दिला होता. मराठवाड्यातील धाराशिव तसेच परभणी जिल्ह्यात ते जिल्हा परिषद निवडणूक प्रचारानिमित्त काही दिवसांत येणार होते. मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी त्यांच्या दौऱ्याच्या नियोजनातच होते. परंतु अजित पवार यांच्या अकाली निधनाचे वृत्त कळताच छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, लातूर, हिंगोली,बीड, परभणी तसेच धाराशिव जिल्ह्यात शोककळा पसरली. राज्याच्या राजकारणातील एक अनुभवी तसेच नि:स्पृह नेता गेल्याने मराठवाडा हळहळला. बीडचे पालकमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य संपूर्ण मराठवाड्याला कायमस्वरूपी लक्षात राहण्याजोगे आहे.१ जानेवारी २०२६ रोजी वर्षाच्या पहिल्याच दिवशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडमध्ये एकाच वेळी १३६३ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करून प्रशासनालाही अवाक् केले होते. केवळ इमारतीच नव्हे तर निसर्गाशी नाते जोडलेले राहावे या उद्देशातून तीस लाखांहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे या उपक्रमाची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली. बीडच्या विकासाची ग्वाही त्यांनी वारंवार दिली होती. त्यामुळे बीडच्या जनतेनेही त्यांना भरपूर प्रेम दिले. १७ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अहिल्यानगर - बीड रेल्वे मार्गाचे उद्घाटन झाले. या प्रकल्पासाठी दोन हजार कोटींपेक्षा जास्त निधी आणि ऐनवेळी दिलेले १५० कोटी रुपये हे अजित दादांनी अर्थमंत्री म्हणून मंजूर केले होते. राज्याचे माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आमदार राणा जगजीतसिंह पाटील, आमदार विक्रम काळे तसेच नांदेड जिल्ह्यातील लोह्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, हिंगोली जिल्ह्यातील वसमतचे आमदार चंद्रकांत नवघरे, परभणीचे आमदार राजेश विटेकर यांना अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त कळताच मोठा धक्का बसला. या आमदारांना अश्रू अनावर झाले. तसेच त्यांचे कार्यकर्ते व पदाधिकारी देखील धाय मोकलून रडत होते. मराठवाड्यातील धाराशिव येथील तेर गावचे अजित पवार हे जावई होत. राज्याचे उपमुख्यमंत्री अचानक गेल्याने धाराशिव जिल्ह्यात प्रचंड शोककळा पसरली. तेर येथे हळहळ व्यक्त करून बाजारपेठ बंद करण्यात आली. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांची बहीण तथा राज्यसभेच्या खासदार सुनेत्राताई पवार या अजित पवार यांच्या धर्मपत्नी. अजित पवार यांचे तेरवासीयांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. राजकारणामध्येही माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील, आमदार राणा जगजीतसिंह पाटील व अजित पवार यांची एकमेकांना साथ होती. दोन्ही कुटुंबांचे नातेसंबंध दृढ असल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात धाराशिवची एक वेगळीच ओळख होती. अजित पवार यांनी अलीकडच्या काळात मराठवाड्यात चांगलाच जम बसविला होता. विशेष म्हणजे अजित पवारांनी मराठवाड्यातील राजकारणात नगर परिषद तसेच नगरपंचायत निवडणूक काळापासून अधिक रस घेण्यात सुरुवात देखील केली होती. मराठवाड्याच्या दौऱ्याप्रसंगी दिलेली वेळ व ठरलेली तारीख अजित दादांनी कधीही चुकविली नाही. त्यामुळे वेळ पाळणारा नेता असा अवेळी निघून जाईल, असे मराठवाड्याला कदापी वाटले नव्हते; परंतु शेवटी ईश्वराचा न्याय हा अन्याय करणाराच ठरला अशीच प्रतिक्रिया मराठवाड्यातून उमटत आहे.

# केंद्र सरकारवर खापर का?

यूजीसी कायदा विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकताच लागू केला असला तरी आंदोलनकर्त्यांनी रोष केंद्र सरकारवर ठेवला होता. खुल्या वर्गातील विद्यार्थी या आंदोलनात उतरल्यामुळे नेमके या कायद्यात काय आहे; विरोध का होत आहे, याबद्दल सर्वसामान्य नागरिकांना उत्सुकता निर्माण झाली.यूजीसी कायद्यातील नवीन नियम लागू करण्याच्या निर्णयाला विरोध करत, उत्तर प्रदेशसह काही राज्यात तरुण रस्त्यांवर उतरले. विद्यापीठ निगडित हा कायदा जानेवारी महिन्यातच देशभर लागू झाला असला तर त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटले नसले तरीही, आंदोलनाचे लोळ कधीही आपल्यापर्यंत पोहोचू शकतात, अशी स्थिती निर्माण झाली होती. खरे तर हा कायदा विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकताच लागू केला असला तरी आंदोलनकर्त्यांनी रोष केंद्र सरकारवर ठेवला होता. खुल्या वर्गातील विद्यार्थी या आंदोलनात उतरल्यामुळे नेमके या कायद्यात काय आहे; विरोध का होत आहे, याबद्दल सर्वसामान्य नागरिकांना उत्सुकता निर्माण झाली. विद्यापीठ परिसर, महाविद्यालयाच्या आवारापुरता मर्यादित असणाऱ्या यूजीसी कायद्यातील नियमाचा विरोध करण्यासाठी विद्यार्थी नव्हे तर पालकसंघटना, उच्चवर्णीय समाजातील नेते मंडळींनी मोर्चे काढले. ९०च्या दशकात मंडल आयोगाच्या शिफारसीवरून उच्चवर्गीय, ओबीसी समाजात निर्माण झालेल्या वादाची पुनर्रावृत्ती होते का, असे वातावरण निर्माण झाले होते. दुसऱ्या बाजूला दलित विद्यार्थी संघटनांकडून या नव्या नियमांची अंमलबजावणी व्हावी यासाठी रस्त्यावर उतरून दबाव गट करण्यात येत होता. त्यामुळे, दोन्ही बाजूने केंद्र सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला. यूजीसी कायद्याच्या नव्या नियमांना आव्हान देणारे प्रकरण सर्वोच्च न्यायायलात पोहोचले. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांनी या नियमांना आव्हान देताना जो युक्तिवाद केला,' त्यात ते मनमानी, भेदभाव करणारे आणि संविधान आणि विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६चे उल्लंघन करणारे आहेत,' असे मुद्दे मांडण्यात आले. प्रथमदर्शनी हे मुद्दे खंडपीठाला पटले. 'नवीन नियम अस्पष्ट आहेत आणि नवीन यूजीसी नियमांचा गैरवापर होऊ शकतो', अशी कडक टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. त्यानंतर पुढील आदेशापर्यंत नवीन यूजीसी नियमांना स्थगिती देण्याचा निर्णय खंडपीठाने घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे, एका अर्थाने चांगले झाले, कारण रस्त्यावरील आंदोलनाची धग शांत होणार आहे.यूजीसीतील नवीन नियम काय आणि त्यातून खरेच खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय होणार होता का हे तटस्थपणे पाहण्याची गरज आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, दिव्यांग आणि महिलांच्या संरक्षणार्थ विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एक नवा नियम जारी केला. या वर्गांच्या संरक्षणासाठी प्रत्येक विद्यापीठात आणि महाविद्यालयात एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. शैक्षणिक परिसरात समानतेचा पुरस्कार करणे हे महाविद्यालय, संबंधित संस्थांना बंधनकारक असणार आहे, असा हा नवीन नियम सांगतो. जाती आधारित भेदभावाच्या तक्रारी वाढल्याच्या तक्रारी सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्यानंतर, त्यावर नवीन नियम करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने या पूर्वीच्या आदेशात दिले होते. यूजीसीने केंद्र सरकारच्या संसदीय समितीकडे एक अहवाल सादर केला होता. या समितीत काँग्रेस, भाजपसह सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे खासदार होते. तो अहवाल पुन्हा दोन वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला. त्या अहवालातील आकडेवारीनुसार, देशभरातील विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये जाती आधारित भेदभावाच्या तक्रारींमध्ये गेल्या ५ वर्षांत ११८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे यूजीसीने कायद्यातील नवीन नियमांमध्ये, ओबीसी, महिला आणि दिव्यांग या वर्गाचा अंतर्भाव केला गेला. नव्या नियमातील या तरतुदींना खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा विरोध आहे. या नियमाचा गैरवापर झाला तर त्यावर काय करायचे याची कोणतीही तरतूद नसल्याचा आरोप केला गेला.मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती बागची यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान उपस्थित केलेले प्रश्न हे समाजातील अस्वस्थतेला कोण जबाबदार हे अधोरेखित करते. आपण जातविरहित समाजाकडे वाटचाल करावी की आपण मागे 'जात' आहोत. आपण विरुद्ध दिशेने वाटचाल करत आहोत का? असे ते प्रश्न समाजातील सर्व घटकांना विचार करायला लावणारे आहेत. यूजीसीच्या नव्या नियमानुसार उच्च शिक्षण संस्थांमध्ये 'इक्विटी' म्हणजे समानता सिद्ध करण्यावर भर देण्यात आला. महाविद्यालयात धर्म, जाती, लिंग या आधारे होणारे भेदभाव मुळापासून नष्ट करणे हा उद्देश आहे. या अंतर्गत विद्यापीठात एक तक्रार सेल स्थापन केली जाणार आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, यापुढे प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्याही भीतीशिवाय पुढे जाण्याची संधी मिळणार आहे. यूजीसीच्या मते जुने कायदे आता कालबाह्य झाल्याने त्यांना अधिक कठोर आणि सोपे बनवले. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थांना समान संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे याआधी २०१२ साली अशाच प्रकारची नियमावली जारी करण्यात आली होती; परंतु ती बंधनकारक नव्हती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानंतर ही नवीन नियमावली जारी करण्यात आल्याने त्याची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने होईल, असे यूजीसीला वाटते. तसेच कुठली संस्था या नियमांचे पालन करणार नाही तर त्यांची मान्यता रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाला असल्याने संस्थांना अडचणीचे वाटत आहे. त्याचप्रमाणे जे कुणी जातीभेद करतील त्या दोषींवर कठोर कारवाई करण्याची तरतुदीसह शैक्षणिक संस्थांना मिळणारे आर्थिक फंडही रोखले जाईल, असे या नियमामध्ये असल्याने ही भीती विद्यार्थ्यांपेक्षा कोणाला आहे हे सांगायला नको. परंतु, नव्या नियमाचा सखोल अभ्यास न करता, खुला वर्ग आणि आरक्षित समाजातील विद्यार्थी यांच्यात तेढ निर्माण करण्याचा कोण प्रयत्न करत आहे, हे पाहिले पाहिजे. समाजात दुही निर्माण करून केंद्र सरकारवर खापर फोडण्याची संधी कोण बघत आहे? केंद्रातील भाजप एनडीए सरकारची प्रतिमा मलिन करण्याचे मनसुबे गेल्या दहा वर्षांत रचले गेले आहेत. यूजीसी कायद्याच्या पडद्याआडून खुल्या वर्गातील व्यक्तींना कोणी भडकावत नाही, याचा विचार करण्याची गरज आहे.

# नवी मुंबईत एमजीएम मेडिकल कॉलेजच्या वतीने मॅपकॉन सीएमईची'चे यशस्वी आयोजन

## देशभरातून ५० नामवंत तज्ज्ञ आणि ३८३ डॉक्टर्स उपस्थित

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई एमजीएम मेडिकल कॉलेज, कामोठे यांच्या वतीने मॅपकॉन सीएमईची'चे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन एमजीएम आरोग्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ शशांक दळवी यांच्या हस्ते करण्यात आले, कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी आयसीएमआरच्या शास्त्रज्ञ डॉ. मनीषा घाटे आणि ऑलएमएस दिल्लीच्या मेडिसिनचे प्राध्यापक डॉ. तुषार सहगल होते.या वर्षीच्या मॅपकॉन सीएमईची'चे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रथमच आयोजित करण्यात आलेली कॅडॅव्हेरिक बोन मॅरो कार्यशाळा, जी तिच्या प्रात्यक्षिक आणि हाताळणी प्रशिक्षणासाठी विशेष प्रशंसनीय ठरली. तसेच पॅथॉलॉजीमधील ANA कार्यशाळा हे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण ठरले, ज्यामुळे सहभागींच्या ऑटोइम्यून आजारांच्या निदानाविषयी आणि प्रयोगशाळा अहवालांच्या अर्थ लावण्याविषयीची समज अधिक सखोल झाली. एओपी महाराष्ट्र चॅप्टर आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट अँड मायक्रोबायोलॉजिस्ट (एमएपीपीएम) यांच्या सहकार्याने झाले.१९८९ साली स्थापन झालेल्या एमजीएम मेडिकल कॉलेज, कामोठे येथील पॅथॉलॉजी विभागाची शैक्षणिक परंपरा गौरवशाली राहिली आहे. या विभागाने आजपर्यंत वैद्यक शास्त्रात अनेक कार्यक्रम केले. इम्युनोफ्लोरेसेन्स आणि फ्लो सायटोमेट्री यांसारख्या प्रगत तंत्रांमध्ये ११ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे, जे आधुनिक पॅथॉलॉजीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले या कॅडेव्हरिक कार्यशाळेत संपूर्ण भारतातील वैद्यकीय महाविद्यालयातील ३८३ डॉक्टर्स उपस्थित होते, त्यांना ५० पॅथॉलॉजी क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ज्ञांची उपस्थिती मार्गदर्शन केले . त्यामुळे हा कार्यक्रम ज्ञानविनिमय, नेटवर्किंग आणि व्यावसायिक विकासासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरला. कार्यक्रमात डायग्नोस्टिक पॅथॉलॉजीमधील अद्ययावत विषयांवर व्याख्याने, पॅनल चर्चा आणि संवादात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.जी. एस. नरशेट्टी, डीन,एमजीएम मेडिकल कॉलेज, कामोठे यांचे विशेष सहकार्य लाभले.



# शेवडी (बा.) येथे ग्रामपंचायतीच्या वतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील शेवडी (बा.) येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिवा संघटना संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष व सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी सरपंच कैलास धोंडे यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी सरपंच बसवेश्वर धोंडे, ग्रामपंचायत अधिकारी हरिहर विश्वासराव यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा तब्बल १५ वर्षांपासून प्रलंबित असलेला राहणीमान भत्ता वितरित करण्यात आला. यामध्ये सन २०२२ मध्ये सेवानिवृत्त झालेले कनिष्ठ लिपिक केरबा रामा एकलारे यांचाही समावेश करण्यात आला. तसेच सध्या कार्यरत असलेले कनिष्ठ लिपिक अरुण राईकवाडे, एकनाथ दुलाजी घुंगराळे व लिंगेश्वर लक्ष्मण डोंगरे यांनाही हा भत्ता प्रदान करण्यात आला. देशाच्या संरक्षणासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या माजी सैनिकांचा, सध्या कार्यरत सैनिकांचा तसेच नव्याने नियुक्त झालेल्या सैनिकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यासोबतच गावातील सर्व शाळेमधील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामविकास अधिकारी हरिहर विश्वासराव यांनी केले. ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने केरबा एकलारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. मनोहर धोंडे सर यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. विविध मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करत प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सरपंच बसवेश्वर धोंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.या विविध सामाजिक व प्रेरणादायी उपक्रमांमुळे शेवडी (बा.) येथे प्रजासत्ताक दिनाचा उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथे स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव श्री. गदळे सर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यकमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. कोकीळ सर होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती शैलजा इंगळे मॅडम उपस्थिती होत्या. यावेळी या सर्वाचे उपस्थित मध्ये ध्वजोरोहन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी स्वामी विवेकानंद,.राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले,नेताजी सुभाषचंद्र बोस. या गटातील विद्यार्थीनी पंथ संचलन व प्रमुख पाहुणेना सलामी दिली. या वेळी विद्यार्थीना खेळाची शपथ देण्यात आली. या स्पर्धेत रोपजंम्प,बुध्दीबळ,योगा,गोळाफेक, बॅडमिंटन या वैयक्तिक स्पर्धेचा समावेश करण्यात आला.व सांघीक स्पर्धेत कब्बडी,खो खो या खेळाचा समावेश करण्यात आला होता. या कार्यक्रमाला श्री. गदळे सर यांनी मार्गदर्शन करताना शाळेचे खेळाडू राज्य




राष्ट्रीय स्पर्धत सहभागी व्हावे अशी आशा व्यक्त केली. या कार्यक्रमात विविध तालुकास्तर व जिल्हास्तरीय खेळाडूंना प्रशस्तीपत्र व मेडल देण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कदम सर यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड यांनी केले या स्पर्धा २२ जानेवारी व २४जानेवारी दिवस घेण्यात आले. या स्पर्धा प्रंचड खेळमेळीच्या वातावरणात संपन्न झाले आहेत. या स्पर्धेमध्ये विद्यार्थीनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन केले या स्पर्धेचे बक्षीस वितरण संस्थाचे अध्यक्ष श्री. अंकुशराव इंगळे साहेब व स्कूल चे मुख्याध्यापक श्री कोकीळ सर यांच्या हस्ते संपन्न झाले या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी यांचा सत्कार श्री. विनोद गुंड सर यांनी केला. यावेळी विजयी संघाना कप व मेडल देण्यात आले.या क्रीडा महोत्सवसाठी श्री कदम सर, श्री. तांदळे सर, मैद सर, , सौ नाईकवाडे मॅडम,सौ कल्याणकर मॅडम, सौ. विटेकर मॅडम, सौ लोखंडे मॅडम, , सौ. काळे मॅडम , थोरात मॅडम , सौ. ठोंबरे मॅडम, सौ कापसे मॅडम, सौ स्वंराजली मॅडम, सौ सावंत मॅडम, सौ राऊत मॅडम, सौ. जाधव मॅडम, महाजन मॅडम, शिक्षक व शिक्षका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या स्पर्धेसाठी सहकार्य केले.

# डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या सोशल मीडिया लोहा तालुका अध्यक्षपदी किरण दाढेल यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

समाजकार्याची आवड, अन्याय-अत्याचाराविरोधात ठाम भूमिका आणि वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून लढा देण्याची तयारी असलेले तरुण, तडफदार नेतृत्व म्हणून ओळख असलेले किरण भाऊ दाढेल यांची डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना - सोशल मीडिया लोहा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. किरण दाढेल हे क्रांतिकारी विचारवंत साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नातू तसेच संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. सचिन भाऊ साठे यांचे खंदे समर्थक म्हणून परिचित आहेत. सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देत, वंचित-शोषित समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या किरण दाढेल यांच्या कार्याची




दखल घेत ही निवड करण्यात आली आहे.ही निवड मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित कार्यकर्ता संवाद बैठकीत करण्यात आली. या बैठकीला संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष मा. सचिन भाऊ साठे,सचिव गणेश भाऊ भगत, ज्येष्ठ नेते व मार्गदर्शक कॉम्रेड अशोक ऊफाडे,रमेश सुर्यवंशी, राजेश इंगळे, भुजंग गायकवाड, ज्ञानेश्वर सोनटक्के, एन जी. पोतरे, पंडित वाघमारे, गंगाधर गायकवाड,द्रौपदाताई कांबळे, राजेश इंगळे, शिवाजी बोयनर जयसिंग कांबळे, भुजंग गायकवाड, नांदेड जिल्हाध्यक्ष पंडितराव वाघमारे, बोनार सर, तसेच आकाश घोडजकर, मिलिंद वाघमारे, संगम कंधारे, करण सावळे, मनोज वाघमारे आदी मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी किरण दाढेल यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत, सोशल मीडियाच्या माध्यमातून संघटनेचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवली असल्याचे सांगितले. किरण दाढेल यांच्या निवडीमुळे लोहा तालुक्यात संघटनेच्या कार्याला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# केज बालाजी मंदिर येथे श्री दास बोध सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन, ३ फेब्रुवारी रोजी होणार प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

श्री समर्थ रामदास स्वामी विरचित श्री दासबोध या ग्रंथाच्या पावन स्मरणार्थ केज शहरात श्री दासबोध सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा सोहळा माघ वद्य द्वितीया, मंगळवार दि.३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारंभ होऊन माघ वद्य नवमी,बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी सांगता होणार आहे.दररोज सकाळी १०-०० ते १-०० या वेळेत पारायण संपन्न होणार असून,सायंकाळी ५-०० वाजता श्रीराम पाठ व रामरक्षा पठण करण्यात येणार आहे.हा धार्मिक कार्यक्रम श्री बालाजी मंदिर,शुक्रवार पेठ,केज येथे आयोजित करण्यात आला आहे.या सामूहिक पारायणात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी श्री. श्रीनिवास गोविंदबुवा केजकर मो.९४०३२९८०८० व सौ.विजया श्रीनिवास केजकर मो. ९८८९१२३४८८ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# मेडिकव्हर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी ७५ वर्षीय महिलेचे प्राणघातक संकट टाळले ; गुंतागुंतीच्या हर्नियावर केले यशस्वी उपचार

दैनिक वादळ वार्ता
**पनवेल । प्रतिनिधी**

नवी मुंबईत अनेक वर्षांपासून जटिल हर्नियामुळे त्रस्त असलेल्या ७५ वर्षीय महिलेला नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रियेनंतर नवे जीवन मिळाले आहे. वारंवार शस्त्रक्रिया करुनही बरी न होणारी ही हर्नियाची समस्या अखेर प्रगत उपचारांमुळे पूर्णपणे दूर करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. नवी मुंबईत राहणाऱ्या श्रीमती सुरेखा पाटील (नाव बदलले आहे)* यांच्या पोटात मागील शस्त्रक्रियेच्या जागी मोठी सूज आढळून आली होती. ही सूज हळूहळू वाढत गेल्यामुळे त्यांना चालणे, बसणे तसेच दैनंदिन कामं करणे देखील अवघड झाले होते. याआधी तीन वेळा हर्नियाची शस्त्रक्रिया होऊनही सूज पुन्हा येत असल्याने त्या शारीरिक व मानसिकदृष्ट्या खूप खचून गेल्या होत्या.

मेडिकव्हर हॉस्पिटलमधील गॅस्ट्रो-इंटेस्टिनल (जीआय) आणि हर्निया शस्त्रक्रियेत तज्ज्ञ असलेल्या डॉ. नितीन तवटे, डॉ. चिराग वजा आणि डॉ. सारंग बाजपेयी यांच्या टीमने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या शस्त्रक्रियेत पोटातील सर्व अवयव त्यांच्या योग्य जागी बसवण्यात आले आणि पोटाची भिंत मजबूत करण्यात आली. भविष्यात हर्निया पुन्हा होऊ नये यासाठी विशेष जाळी देखील बसवण्यात आली.

डॉ. नितीन तवटे(गॅस्ट्रो-इंटेस्टिनल (जीआय) आणि हर्निया शस्त्रक्रिया सर्जन, मेडिकव्हर हॉस्पिटल) सांगतात की, इन्सिजनल हर्निया म्हणजे आधी झालेल्या शस्त्रक्रियेच्या जागी पोटाच्या भिंतीतील कमकुवत भागातून आतले अवयव बाहेर येणे. या रुग्णामध्ये हर्निया वारंवार होण्यामागे अनेक कारणे होती. यामध्ये पूर्वी झालेल्या अनेक शस्त्रक्रिया, वाढते वय, स्नायूंची बळकटी कमी होणे आणि उपचारांना झालेला विलंब यांचा समावेश होता. वारंवार होणाऱ्या हर्नियामध्ये केवळ साधी शस्त्रक्रिया पुरेशी ठरत नाही. हे प्रकरण अतिशय आव्हानात्मक होते, कारण पोटाची भिंत खूप कमजोर झाली होती आणि पोटातील अवयव हळूहळू बाहेरच्या दिशेने सरकले होते. आमचे मुख्य उद्दिष्ट हे सर्व अवयव सुरक्षितपणे पुन्हा पोटात बसवणे आणि पोटाच्या भिंतीला दीर्घकाळ टिकणारी मजबुती देणे हे होते.

डॉ. चिराग वाजा आणि डॉ. सारंग बाजपेयी ( जीआय आणि हर्निया सर्जन) सांगतात की, पहिल्या टप्प्यात पोटाचे ताणलेले स्नायू सैल करण्यासाठी बोटॉक्स इंजेक्शन देण्यात आले. त्यामुळे पोटावरील ताण कमी झाला आणि पुढील शस्त्रक्रियेसाठी शरीर तयार झाले. दुसऱ्या टप्प्यात पोटाची पोकळी हळूहळू वाढवण्यात आली, जेणेकरून अवयवांवर अतिरिक्त दाब न पडता त्यांना सुरक्षितपणे आत बसवता येईल. शेवटच्या टप्प्यात पोटाच्या भिंतीची दुरुस्ती करण्यात आली. यासाठी मोठ्या आकाराची जाळी बसवण्यात आली, ज्यामुळे पोटाला दीर्घकालीन आधार मिळाला.




डॉ. तवटे पुढे सांगतात की, शस्त्रक्रियेनंतर दुसऱ्याच दिवशी रुग्ण चालू लागल्या. काही दिवसांत त्यांना सामान्य आहार देण्यात आला आणि पाच दिवसांत त्यांना घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिरावली असून त्या हळूहळू दैनंदिन जीवनात परतत आहेत.हर्नियाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी रुग्णाला १ ते १.५ महिने पोटाला पट्टा वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. रुग्ण श्रीमती सुरेखा पाटील म्हणाल्या, मी अनेक वर्षांपासून खूप त्रास सहन करत आहे. अनेक शस्त्रक्रिया करुनही पाहिजे तसा आराम मिळत नव्हता. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या प्रयत्नांनी मला पुन्हा सामान्य आयुष्य जगण्याची संधी दिली आणि मी त्यांचे मनापासून आभार मानते. खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्रप्रमुख संदिप जोशी सांगतात की, वरील प्रकरणातून मेडिकव्हर रुग्णालय गुंतागुंतीच्या व वारंवार कराव्यात लागणाऱ्या शस्त्रक्रियेच्या समस्या तज्ज्ञांच्या एकत्रित प्रयत्नांनी यशस्वीपणे सोडवू शकते, हे स्पष्ट होते.अनुभवी डॉक्टर, आधुनिक सुविधा आणि योग्य नियोजनाच्या मदतीने अशा गुंतागुंतीच्या आजारांवरही यशस्वीपणे मात करता येते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

# राखेतून पुन्हा उभारी!

# युवा क्रांती संघटनेचे बर्डी गावात ऐतिहासिक श्रमदान

## आगीत जळलेल्या घरांसाठी शेकडो तरुण सरसावले

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

मित्रांनो, माणुसकी अजूनही जिवंत आहे, याचा प्रत्यय पुन्हा एकदा नंदुरबार जिल्ह्यात आला आहे. अक्कलकुवा तालुक्यातील बर्डी गावात आगीने तीन कुटुंबांचा संसार राख केला, पण त्यानंतर जे घडलं ते संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. 'युवा क्रांती नंदूरबार' या संघटनेने केवळ घोषणा न देता, प्रत्यक्ष हातात फावडे-टोपले घेऊन आगीत होरपळलेल्या कुटुंबांसाठी नवी घरे उभारायला सुरुवात केली आहे. पाहुयात आमचा हा विशेष रिपोर्ट...

नंदुरबारच्या अक्कलकुवा तालुक्यातील हे बर्डी गाव. काही दिवसांपूर्वी लागलेल्या एका भीषण आगीने इथल्या तीन कुटुंबांच्या डोळ्यांसमोर त्यांचं सर्वस्व हिरावून नेलं. राहतं घर, अन्नधान्य आणि कपडे... सगळं काही क्षणात खाक झालं. ही कुटुंबं अक्षरशः उघड्यावर आली होती.

संकट मोठं होतं, पण मदतीचे हातही तेवढेच भक्कम निघाले. 'युवा क्रांती नंदूरबार' सामाजिक संघटनेला ही माहिती मिळताच, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी थेट ग्राउंड झिरोवर धाव घेतली. केवळ सांत्वन करून हे तरुण थांबले नाहीत, तर त्यांनी सुरू केली एक मोठी लोकचळवळ! लोकसहभागातून निधी गोळा झाला आणि बांधकाम साहित्यही आलं. पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ॲडव्होकेट रुपसिंग वसावे, ॲडव्होकेट संग्राम पाडवी, इंजिनियर संदीप वळवी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते स्वतः मजूर म्हणून कामाला लागले. वकिली करणारे हात आज विटा उचलत होते, तर कोणी सिमेंट कालवत होते. पद आणि प्रतिष्ठा विसरून हे तरुण फक्त माणुसकीसाठी राबत आहेत.

यावेळी ॲडव्होकेट रुपसिंग वसावे म्हणले की,

आमच्या बांधवांवर संकट आलं असताना आम्ही शांत बसू शकत नव्हतो. सरकारने मदत द्यायला वेळ लागेल, पण तोपर्यंत ही मुलं उघड्यावर राहू शकत नाहीत. म्हणूनच आम्ही सर्वांनी मिळून स्वतःच्या हाताने ही घरं उभी करण्याचा निर्णय घेतला आहे.खरंच, आजच्या काळात जिथे लोक फक्त सोशल मीडियावर दुःख व्यक्त करतात, तिथे 'युवा क्रांती'च्या या शिलेदारांनी प्रत्यक्ष कामातून आदर्श उभा केला आहे. लवकरच या तीनही कुटुंबांना त्यांच्या हक्काचं घर मिळणार आहे. या तरुणांच्या या कार्याला आमचा मानाचा मुजरा!



# काँग्रेसचा विचार तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी प्रतिभा शोध अभियानात भाग घ्या-हरी शंकर गुप्ता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे**

काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करण्याच्या अनुषंगाने काँग्रेसचा विचार, इतिहासाची माहिती असणारे, लोकशाही व संविधानवादी लोकांना एक व्यासपीठ देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाने सुरु केला आहे. राज्यातील सर्व स्तरातील लोकांना यात सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न असून त्यासाठी प्रतिभा शोध अभियान (ढश्रशपीं र्कीपीं) सुरु करण्यात आले आहे. या अभियात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन दिल्लीचे माजी आमदार व या अभियानाचे महाराष्ट्र प्रभारी हरी शंकर गुप्ता यांनी केले आहे.




प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत प्रतिभा शोध अभियानाची माहिती देताना हरी शंकर गुप्ता पुढे म्हणाले की, जिल्ह्या जिल्ह्यात विविध विषयाची उत्तम ज्ञान असलेले अनेक लोक आहेत, त्यांना काँग्रेस पक्षाशी जोडण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. यात निवड झालेल्यांना संशोधन विश्लेषक, प्रवक्ते तसेच काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागात काम करण्याची संधी देण्यात येईल. तीन टप्प्यात हा कार्यक्रम होणार असून या अभियासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करायचे आहेत, त्यानंतर त्या अर्जांची छाननी केली जाईल. काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पत्रकार, इतिहास तज्ञ यांसह विविध क्षेत्रातील तज्ञ यांची समिती छाननी झालेल्यांची मुलाखत घेतील व त्यातून अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अंतिम निवड करेल. देशभरात हे अभियान सुरु असून उत्तर प्रदेशातून ५५० जणांनी यासाठी नाव नोंदणी केली आहे तर जम्मू काश्मीर मधून १०० लोकांनी नोंदणी केली आहे. झारखंड, ओडीशा या राज्यातूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे, असेही हरि शंकर गुप्ता म्हणाले..

यावेळी प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते सुरेश राजहंस उपस्थित होते.

यावेळी वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, राजकारणात येण्याची अनेकांची इच्छा असते पण मार्ग नसतो, समाजातील प्रतिभासंपन्न लोकांच्या प्रतिभेला चालना देण्याचा काँग्रेस पक्ष प्रयत्न करत आहे. हा एक पारदर्शक कार्यक्रम आहे. लवकरच राज्याच्या सहाही भागात पत्रकार परिषद घेऊन या कार्यक्रमाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आहे.आर्थिक सर्वेक्षणावर विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना अतुल लोंढे म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था डबघाईला गेली आहे हे आम्ही सातत्याने सांगत आहोत, तेच या आर्थिक सर्वेक्षणात सांगितले आहे. मेक इन इंडिया अपयशी ठरले आहे, आयात वाढली आहे. केंद्रापेक्षा राज्य सरकारांनी जास्त कर्ज काढल्याचे दिसत असून हे कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागत आहे. विकास योजनावरचा खर्च कमी थांबवावा लागत आहे असे अतुल लोंढे म्हणाले.

या पत्रकार परिषदेला मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी साहेब हिंगणी (बु.) गायरान जमिनी मध्ये टोरेन्ट पॉवर पवनचक्की कंपनीची दादागिरी सुरुच

## कसत असलेल्या गायरान धारकांना गुंड लोकांकडुन धमकी-विवेक कुचेकर

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**


बीड तालुक्यातील चौसाळा परिसरातील हिंगणी(बु)शिवारातील गायरान जमिनीमध्ये टोरेन्ट पॉवर पवनचक्की कंपनी कडुन महसूल विभागाची पुर्व परवानगी न घेता अनाधिकृतपणे नंबर बांध रस्त्यावर विधुत वाहिनी चे पोल उभे केल्याचा प्रकार उघडकीस आला होता याची रितसर लेखी तक्रार चौसाळा येथील सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी बीड जिल्हाधिकारी व बीड जिल्हा पोलीस अधीक्षक व तसेच बीड तहसीलदार यांच्याकडे दिनांक ०१/०१/२०२६ रोजी केली होती या निवेदनाची दखल घेत बीड जिल्हाधिकारी व बीड तहसीलदार यांनी चौकशी चे आदेश दिले होते लगेच महसूल विभागाने तात्काळ घटनास्थळी भेट देत सदरील विधुत वाहिनी च्या पोल चा स्थळ पंचनामा करत बीड तहसीलदार यांच्याकडे अहवाल सादर करण्यात आला आहे परंतु टोरेन्ट पॉवर पवनचक्की कंपनीचे कर्मचारी हे कसत असलेल्या गायरान धारकांना व तक्रारदाराला गुंडप्रवृत्तीचे लोक आणून धमकावत आहेत व सदरील विधुत वाहीनी च्या पोल चे काम सुरुच ठेवले असुन याठिकाणी एखादा अनुसुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे याबाबतीत जिल्हाप्रशासनाने तात्काळ या टोरेन्ट पॉवर पवनचक्की कंपनी च्या कर्मचाऱ्यांवरती कायदेशीर कारवाई करुन नंबर बांध रस्त्यावर रोवलेले पोल बाजुला हटवुन रस्ता मोकळा करुन देण्यात यावा अन्यथा दिनांक २३फेब्रुवारी २०२६ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जीव स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल व याची सर्व जबाबदारी जिल्हा प्रशासनाची राहील असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# शहादा शहर हादरले! ओम शांती नगर, सन सिटी नं.२ मध्ये चोरांचा उन्मत्त धुमाकूळ-घरात माणूस असतानाही घुसखोरी, दगडफेक करत दहशत!

दैनिक वादळ वार्ता
**वडाळी । लाला चहाण**

शहादा येथील ओम शांती नगर, सन सिटी नंबर २ परिसरात चोरट्यांनी अक्षरशः उच्छाद मांडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरात व्यक्ती उपस्थित असतानाही निर्ढावलेल्या चोरांनी घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, तसेच आजूबाजूच्या घरांवर दगडफेक करून संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण केले.

ही घटना म्हणजे केवळ चोरीचा प्रयत्न नसून नागरिकांच्या सुरक्षिततेवर थेट हल्ला असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. चोरांनी दहशत माजवून चोरी करण्याचा डाव आखल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आम्ही घरात सुरक्षित नाही का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.विशेष म्हणजे, या भागात रात्री पोलीस गस्त जवळपास नसल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. वारंवार अशा घटना घडत असूनही पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष खदखदत आहे.



या गंभीर घटनेनंतर पोलीस प्रशासनाने तातडीने रात्रीची गस्त वाढवावी, सीसीटीव्ही तपासणी करावी आणि चोरट्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. अन्यथा नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशाराही देण्यात येत आहे.

शहादा शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलीस प्रशासन आता तरी जागे होणार का? असा सवाल सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

# रासेयो उपक्रमांतर्गत शिवणीत रक्तक्षय तपासणी शिबिराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष शिबिराच्या अंतर्गत तालुक्यातील शिवणी येथे मुला-मुलींसाठी अनेमिया (रक्तक्षय) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी शिवनी येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश काकडे व त्यांची आरोग्य टीम उपस्थित होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुला-मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासण्यात आले. तपासणीदरम्यान रक्तक्षयाची कारणे, लक्षणे, दुष्परिणाम तसेच प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी निकाळजे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.किशोर वाघमारे, प्रा.सुरेश कसबे तसेच सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




# किंमतीपेक्षा जास्त दराने युरिया खताची विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर तात्काळ कारवाई करा-प्रा.आंधळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकरी अतिवृष्टीने होरपळून निघाला आहे यावर्षी कापूस व सोयाबीन काढून ज्वारी,बाजरी,गहू भुईमूग पीक घेऊन कुठेतरी आशेचा किरण पाहत असताना व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक युरियाचा साठा करून कृत्रिम तुटवडा निर्माण करत आहेत तसेच जास्त दराने युरिया खताची विक्री करत असल्याचे दिसून येत आहे.या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे युरिया खताची साठेबाजी करून शेतकऱ्यांना २६६ रुपये किमतीचा युरिया ४०० ते ५०० रुपये किमतीने विकला जात आहे हे दुर्दैव आहे.खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या व जास्त भावाने युरिया खताची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी या मागणी करिता ग्रामीण युवक संघटना आता रस्त्यावर आलेली आहे. किंमतीपेक्षा जास्त भावाने विक्री करणाऱ्या व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक यांना आपल्याकडील युरियाचा साठा किती आहे याचा माहिती फलक लावणे बंधनकारक करावे शेतकऱ्यांची आडवणूक करून जास्त दराने युरिया खताची विक्री करणाऱ्यांचा परवाना तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे नसता संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



# खरब खांडगाव येथे भूमिपुत्रांचा सन्मान



दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या मुखेड तालुक्यातील खरब खंडगाव येथे जागृत ओमकारेश्वर यात्रेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्याच्या निमित्ताने गावातील भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा श्री नागनाथ पाटील एक काळे यांच्या संकल्पनेतून सत्याच्या सांगत्यानिमित्त करण्यात आला गावातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या शंभरहून अधिक कर्मचारी व विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा करण्यात आला श्री वीरूपक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सन्मान १६ भव्यदिवे पार पडला या कार्यक्रमाला खरब खंडगाव पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. युरुपक्ष शिवाचार्य महाराज व साखर खेडकर महाराज यांच्या आशीर्वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली सलग ४० वर्ष परंपरा जोपासत ओमकारेश्वर येथे ला स्फुर्त प्रतिसाद लाभला.

# प्रो.विष्णु सरवदे यांचे वडील रानबा सरवदे यांचे वृद्धापकाळाने निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील साबला येथील रहिवासी तथा जेष्ठ नागरिक रानबा पंढरी सरवदे (वय ९५) यांचे गुरुवार दि. २९ जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. काही दिवसांपासून प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर घरच्या घरी उपचार सुरू होते. अखेर वयोमानामुळे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रानबा सरवदे हे अत्यंत साधे, मनमिळावू आणि कष्टाळू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून त्यांनी आपल्या कष्टातून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. गावातील सामाजिक, धार्मिक व सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सक्रीय सहभाग असे. शांत स्वभाव, प्रामाणिकपणा व माणुसकी ही त्यांची ओळख होती.शुक्रवार दि. ३० जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता साबला येथील त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी आदिवासी विभाग अव्वर सचिव अरविंद कांबळे, उपविभागीय अभियंता भीमराव कांबळे, साबला गावचे सरपंच नरहरी काकडे, आरपीआय जेष्ठ नेते कपिलभाऊ कागदे,आरपीआय केज तालुकाध्यक्ष दिपक कांबळे चेअरमन दत्ता काकडे , महादेव कटारे, उमा शंकर शिंदे, कुटुंबीय, नातेवाईक, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रानबा सरवदे यांच्या पश्चात पत्नी, सहा मुली, जावई, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. हैद्राबाद विद्यापीठाचे प्रा. विष्णु सरवदे व रिपाइंचे माजी केज तालुकाध्यक्ष राहुल सरवदे यांचे ते वडील होत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077